महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
प्रकाशगड, ४था मजला, प्रा.अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),मुंबई - ४०० ०५१ दूरध्वनी- २६४७४२११, २६४७२१३१
Website:www.mahadiscom.in, E-mail :www.msedclsalary@gmail.com

संदर्भ :- मा.सं./वे व दे / २८४४६ दिनांक :- १०.१०.२०१९

# परिपत्रक

विषय :- माहे ऑक्टोबर २०१९ चे वेतन दिवाळीपूर्वी अदा करणेबाबत.

महाराष्ट्र राज्य शासनाने, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९ / प्र. क्र. १५३ / कोषा प्र.५ दि.०९.१०.२०१९ अन्वये शासकिय कर्मचाऱ्यांना आगामी दिवाळीचा सण विचारात घेऊन माहे ऑक्टोबर २०१९ या महिन्याचे वेतन व भत्ते याचे प्रदान दि.२४.१०.२०१९ पूर्वी करण्यात यावे तसेच निवृत्ती वेतनधारकांना/कुटुंब निवृत्ती धारकांना त्यांचे माहे ऑक्टोबर २०१९ या महिन्याचे निवृत्ती वेतन दि.२४.१०.२०१९ पूर्वी प्रदान करण्यात यावे, असे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने घेतला आहे. त्यानुसार मुख्य कार्यालयासह क्षेत्रिय कार्यालयांना अधिसूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत्ती वेतन धारक / कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांना माहे ऑक्टोबर २०१९ चे वेतन व भत्ते /निवृत्ती वेतन दि.२४.१०.२०१९ पूर्वी प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी वेतन व भत्ते देण्यासाठी योग्य ती कार्यबाही करुन त्यांच्या क्षेत्रातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या माहे ऑक्टोबर २०१९ चे वेतन व भत्याची रक्कम अदा करण्यासाठी मुख्य कार्यालयास वेतन व भत्याची संपुर्ण माहिती दि. २२.१०.२०१९ रोजी अथवा पुर्वी सादर करावी. तसेच ज्यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्ती वेतन क्षेत्रिय कार्यालयाकडून अदा करण्यात येतात त्यांनी निधी उपलब्धतेसंबंधी सहाय्यक महाव्यवस्थापक (विंवले-अर्थोपाय) यांना योग्य वेळेपूर्वी कळविण्यात यावे व त्याअनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करावी.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या **Employee Portal(e-library)** वर उपलब्ध करण्यात आले आहे.

कमांडर शिवाजी इंदलकर (निवृत्त)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं) (प्रभारी)

Scanned by CamScanner